# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ५ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरूवार दिनांक १५/०२/२०२४ सकाळी ११-३० वाजता भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ६. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ७. | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ८. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र.मुख्य लेखा परिक्षक |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ११. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १२. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १४. | श्री. रितीक गोयर | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १५. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| १७. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| १८. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक |
| १९. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २०. | श्री. कमलेश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| २१. | श्री. अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २२. | श्री.राजेश गायकवाड | मनपा शिक्षण मंडळ |
| २३. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |

| | | |
|---|---|---|
| २४. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २५. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-३३ विकसित भारत संकल्प यात्रा कार्याक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी अनुषंगीक व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्चास रू. १,४३,२५२/- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार कार्यात्तर मान्यतेस्तव सादर झालेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शाखा अभियंता विकसीत भारत संकल्प यात्रा शुभारंभ हा कार्यक्रम आपण धुळे मनपाच्या ग्राउंडवर केला होता. मा. खासदार महोदयांच्या उपस्थितीत त्यासाठी आपण संपूर्ण व्यवस्था केली होती. त्यामध्ये चहा बिस्कीटे, वॉटरप्रुफ मंडप व्यवस्था, स्टॉल, टेबल,खुर्ची सजावटीसह मॅटींग, साउंड सर्व्हीस, एलईडी स्क्रीन, लाईव्ह कॅमेरा, जनरेटर डिझेलसह फोकस, पोडीयम अशी व्यवस्था केली होती. तरी काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा मे. धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांच्याकडून करुन घेतले कार्योत्तर मंजूरी होण्यास शिफारस आहे.

म.अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३३ दिनांक १५/०२/२०२४**

भारत सरकारच्या प्लगशीप योजनेचे लाभ लक्ष्यित लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचावेत या दृष्टीने केंद्र शासनाने ज्या योजनांचे लाभ लक्ष्यित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेले नाहीत अशा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने "विकसित भारत संकल्प यात्रा" या नावाची देशव्यापी मोहिम दि. १५/११/२०२३ ते दि २६/०१/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.

यासाठी अनुषंगिक कामे मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे यांच्या कडून दि.२९/११/२०२३ रोजी भारत सरकार " विकसित भारत संकल्प यात्रा " देशव्यापी मोहीम अंतर्गत मा.जिल्हाधिकारी कार्यालयकडून प्राप्त व्हॅनशुभारंभ कार्यक्रम अनुषंगाने करून घेतले आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास बाजारभाव दर **रु १,४३,२५२/-** चे काम करण्यात आले असून सदरचे काम विना निविदा मे. धनलक्ष्मी

मंडप डेकोरेटर्स,धुळे यांच्या कडून करून घेतले असून कामास व खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- **x x x**

**अमिता दगडे-पाटील,**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३४ मुलभूत सेवा-सुविधांचा विकास योजना सन २०२३-२३ अंतर्गत प्र.क्र.८ मध्ये उर्दु शाळा क्र.२५ प्रांगणात विद्यार्थ्यांसाठी विविध उपयोगी सभागृह बांधणेबाबत निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता शासनाच्या मुलभुत सोई सुविधा अंतर्गत प्र. क्र. ८ मध्ये उर्दू शाळा क्रं. २५ च्या प्रांगणात विद्यार्थ्यांसाठी विविधोपयोगी सभागृह बांधणे कामी २ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. उकत कामाबाबत निविदा प्रसिध्द करणेत येऊन निविदा दर मागविण्यात आले होते. त्यात रिजवान अहमद युसुफ पटेल यांची सर्वात कमी दर आले असून ते अंदाजपत्रकीय दराने आहेत. स्थायी समितीपुढे शिफारस करण्यात येत आहे.

म.कार्यकारी अभियंता सदर विषयास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३४ दिनांक १५/०२/२०२४**

क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत उर्दु शाळा क्र. २५ प्रांगणात विद्यार्थ्यासाठी विविधोपयोगी सभागृह बांधणे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / १३१२ दि.२०/१०/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२००२८४९५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ८१ दि.०९/०८/२०२३ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **रिजवान अहमद युसुफ पटेल** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **रिजवान अहमद युसुफ पटेल** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- **x x x**

**अमिता दगडे-पाटील,**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-३५ | मुलभूत सेवा-सुविधांचा विकास योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक १६ कुणाल हौ. सोसायटी येथे गटार करणेबाबत निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधां अंतर्गत सन २३-२४ साठी प्रभाग १६ कुणाल हौसिंग सोसायटी येथे गटार करणे कामी मा. जिल्हाधिकारी साहेबांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. यात १००% अनुदान मिळणार आहे. यात सर्वात कमी दराची निविदा खलीद शेख यांची आली आहे. स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी शिफारस करण्यात येते आहे. |
| म.कार्यकारी अभियंता | सदर विषयास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३५ दिनांक १५/०२/२०२४**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत प्रभाग क्र. १६ कुणाल हौ. सो. येथे गटार करणे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / १३१२ दि.२०/१०/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९९४१०३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ८६ दि.०९/०८/२०२३ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **खालिद शेख** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **खालिद शेख** यांची **अंदाजपत्रकीय** दराने

आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- **x x x**

**अमिता दगडे-पाटील,**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-३६ | अल्पसंख्याक क्षेत्र विकास योजना सन २३-२४ अंतर्गत प्र.क्र.१८ सर्व्हे नं.५२६ मधील भाईजी नगर येथे ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणेबाबत निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | अल्पसंख्यांक क्षेत्र विकास अंतर्गत प्र. क्र. १८ येथील सर्व्हे नं. ५२६ भाईजी नगर येथे ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणे कामास मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. यात १००% अनुदान उपलब्ध होणार आहे. ई निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यात एस.एम.डी डेव्हलपर्स ॲण्ड इन्फ्रा यांचे अंदाजपत्रकीय दर प्राप्त झाले आहे. स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी शिफारस करण्यात येत आहे. |
| म.मुख्य लेखाधिकारी | सदर विषयास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३६ दिनांक १५/०२/२०२४**

अल्पसंख्यांक क्षेत्र विकास अंतर्गत प्रभाग क्र. १८ मधील सर्व्हे नं.५२६ भाईजी नगर येथे ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / १४५९ दि.१९/१२/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९९९९०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ४०३ दि.२१/१२/२०२३ अन्वये रक्कम रुपये ९९,९८,९९७/- तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **SMD डेव्हलपर्स ॲण्ड इन्फ्रा.** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **SMD डेव्हलपर्स ॲण्ड इन्फ्रा.** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. सही/- **x x x**

**अमिता दगडे-पाटील,**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३७ केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अमृत 2.0 अंतर्गत धुळे पाणी पुरवठा योजनेवरील विद्युत व यांत्रिकी कामाचे निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता यामध्ये अमृत २ योजने अंतर्गत इलेक्ट्रीकल या कामाची ई निविदा काढली होती यामध्ये ३ निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यापैंकी मे. बडगुजर ॲण्ड कंपनी नाशिक यांचे शे. ११.९६% ने सर्वात कमी दर आले आहे. निगोशिएशन साठी पत्र दिले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने त्यांनी खुलासा केला आहे. सदरचा खुलासा टिपनीमध्ये दिला आहे. व सद्यस्थितीत बाजार भावाची तुलना करता त्यांचा दर योग्य आहे म्हणून मंजूरीसाठी शासनाकडे शिफारस करावी लागणार आहे. सदर प्रस्ताव स्थायीपुढे मंजूरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

म.आयुक्त अमृत २ मधील वॉटर सप्लाय मधील जे काम आहे इलेक्ट्रीकल व मॅकेनिकल चे टेंडर आहे हे पी डब्ल्यु डी जी. आर नुसार प्रोसेस केलेले आहे का? आता हे मान्यतेसाठी एसएलटीसी पुढे पाठवणार आहात आत करंट टीएसआर काय रेट ने येते? ते टिपनीत नमूद नाही.

म.अभियंता हो जी आर नुसार प्रोसेस केली आहे. करंट टीएसआर ८.५६ जादाने येणार आहे.

म.आयुक्त याचे टीएसआर चे काम आहे आणि ईंटर्नल त्याचे टेंडर चा काय विषय आहे?

म.अभियंता त्यांना निगोशिएशन साठी पत्र दिले होते. त्यांचे दर साधारणत: १०% पेक्षा जास्त होते. तपासण्यासाठी कंन्सलटंट कडे सादर केले आहे.

म.आयुक्त १०% च्या वर जाणार नाही याची खात्री करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३७ दिनांक १५/०२/२०२४**

केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत पाणी पुरवठा योजनाकामास शासन निर्णय क्र. अमृत २०२३ / प्र.क्र. ३९७ / नवि ३३ दि. १७/१०/२०२३ अन्वये प्रशाकीय मान्यता खर्च रक्कम रु.१४२.७६ कोटी मात्रस शासना कडून मंजुरी प्राप्त आहे.

केंद्र शासन निधी ३३.३३% , राज्य शासना निधी ३६.६७% व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा हिस्सा ) ३०% असा योजनेचा आकृतीबंध आहे.

सदर योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक PMC मार्फत तयार करणेत आलेले आहे. सदर कामाचा अंदाजपत्रकास म.मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग , नाशिक यांच्या कडील पत्र क्र. मजीप्रा / नाशिक / चिशा / ८१६ / २०२३ दि.२९/०३/२०२३ अन्वये रु.१७७.०८ मात्रस तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार सदर निविदेत **A.** Price Escalation Clause **B.** Work Addition Pre-Qualification Criteria **C.** Geo- Tagging च्या तरतुदी वाढविणेत आले. त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मंजुरी घेवून राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC)मंजुरीसाठी रोजी सादर केले.

म.प्रधान सचिव , नवि- २ , महारष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४/१२/२०२३ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC)ची बैठक पार पडली त्यात खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

म.आयुक्त , धुळे मनपा यांनी समिती समोर केलेल्या विनंती Geo- Tagging चा समावेश निविदेत करावा तथापि केवळ Geo- Tagging नसल्यामुळे कोणत्याही निविदा धारकास अपात्र ठरविण्यात येऊ नये व त्यांना Geo- Tagging करणेची संधी द्यावी. पात्र निविदा धारकास Geo- Tagging करण्यास नकार देत असल्यास त्यास अपात्र ठरविण्याचे अधिकार आयुक्त , धुळे मनपा यांना असतील.

उक्त बाबत अमृत २.० अंतर्गत धुळे पाणीपुरवठा योजना कामासाठी ई- निविदा सूचना क्र. १६४ सन २०२३-२४ नुसार रु ११८.१४ कोटी मात्रची निविदा दै. हिंदुस्थान टाईम्स / लोकसत्ता (मराठी ) / पुण्य नगरी या वृत्तपत्रातून दि.२९/१२/२०२३ रोजी जाहीर निविदा प्रसिद्ध देण्यात आलेली होती.एकूण रु.११८ .१४ कोटी पैकी विद्युत व यांत्रिकी कामासाठी रु.२९.७६ कोटी ची निविदा प्रसिद्ध देण्यात आली .उक्त कामाची ई-निविदा पूर्व बैठक दि.१२/०१/२०२४ रोजी म.आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनात ठेवण्यात आली.

उक्त बाबत दि.०१/०१/२०२४ रोजी तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. सदर निविदेत एकूण ०३ निविदा धारकांनी सहभाग घेतलेला आहे.

१) मे.बडगुजर & कंपनी,नाशिक

२) मे.फ्रेंड्स इंजिनिरिंग कॉर्पोरेशन,नवी-मुंबई

३) सुहास इलेक्ट्रिकल्स ,ठाणे

सदर निविदा धारकांचे कागदपात्रांची छाननी धुळे महानगरपालिका व मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांच्या मार्फत करण्यात आली. मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांच्या कडील पत्र क्र. टीएनसि / धुळे / पापुयो / ८९२ दि. ०३/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वरील तिन्ही निविदा धारकांचे कागदपात्रांची छाननी शिट प्राप्त झाली. कागदपत्रे पूर्ण असल्याने वरील तिन्ही निविदा धारक पात्र झालेले आहे.

उक्त बाबत दि.०९/०२/२०२४रोजी म.आयुक्त तथा प्रशासक,धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या दालनात व्यापारी लिफाफा उघडण्यात आले असण खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्त्यात त्यांचे दर सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.बडगुजर & कंपनी,नाशिक | शे.११.९६.००% जास्तीने | सर्वात कमी |
| उ<br>२ | मे,फ्रेंड्स इंजिनिरिंग कॉर्पोरेशन,नवी-मुंबई | शे.१४.८५.००% जास्तीने | |
| क्त<br>३ | मे,सुहास  इलेक्ट्रिकल्स ,ठाणे | शे.१५.२५.००% जास्तीने | |

कामाची Comparative Statement नुसारमे.बडगुजर & कंपनी,नाशिक निविदा यांचे दर  सर्वात कमी असून शे.११.९६.% जास्तीने आलेले आहे. सदरचे कामाचे दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.११.९६.००% जास्तीचे असल्याने  सदर कामाचा राज्य दर सूची ( S.S.R. )नुसार दराचे पृथ्थिकरण करून सादर करणे बाबत  तसेच वाटाघाटी अंती दर कमी करणे बाबत या कार्यालया कडील पत्र क्र. / पापुवि/  ९४८  दि.०९/०२/२०२४ नुसार पत्र देण्यात आले आहे. तसेच मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांना या कार्यालया कडील पत्र क्र. / पापुवि/ ९५० दि.०९/०२/२०२४ अन्वये दराचे पृथ्थिकरण करून सादर करणे बाबत कळविले आहे.

उक्त बाबत **मे.बडगुजर & कंपनी,नाशिक. यांच्या कडील दि.११/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये** विषयांकित कामाची निविदा निविदा प्राकलन दराच्या ११.९६% जादा दराने भरलेली आहे.या निविदेत विविध प्रकारच्या कामाचा समावेश असून त्याचे विस्तृत दर पृथःकरन सादर केलेले आहे.

तसेच अमृत योजनेच्या अटी शर्ती नुसार सर्व साहित्याचा दोषदायित्व कालावधी हा ५ वर्ष देण्यात आला आहे.परंतु सर्व साहित्याचे उत्पादक फक्त १ वर्षाची वॉरंटी देतात, जास्तीच्या वॉरंटी साठीव दोषदायित्व कालावधीतील दुरुस्तीसाठी आम्हाला सर्व उत्पादकांना अतिरिक्त रक्कम द्यावी लागणार आहे.त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता आम्ही भरलेले दर योग्य

आहेत परंतु आपण दिलेल्या पत्राला मान देऊन आमचे दर ०.१०% कमी करून प्राकलन दराच्या ११.८६% जादा दराने करण्यास तयार असल्याचे पत्र सादर केलेले आहे.

या संदर्भात याकामी नियुक्त निसर्ग कंन्सटन्सी नाशिक यांनी सदर प्राप्त देकार रकमेशी चालू दरसूचीशी तुलना केली असता सदर प्राप्त दर ८.५६% जादा दराने असल्याचे लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे.

याबाबत म. शहर अभियंता यांचा वाचा क्रं. २ मधील अहवालानुसार **मे.बडगुजर & कंपनी,नाशिक यांचे दर शे. ११.८६.००% जास्तीने ( चालू दरसूचीनुसार ८.५६% जादा दराने)** आलेले असून सदर दरास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव शासन तथा सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यांस शिफारस करण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**